# प्रेसनोट

दि. १८/०९/२०२४

## उत्पन्नाचा दाखला व डोमिसाईल सर्टिफीकेट काढून देण्यासाठी महा ई-सेवा केंद्रातील दोघांवर लाच मागणी व लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | दिघी पोलीस स्टेशन, पिंपरी-चिंचवड, पुणे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलमान्वये. |
| तक्रारदार | पुरुष, वय ५४ वर्ष |
| आरोपी नाव व कार्यालय | १) संतोष बबन वाळके, वय ४८ वर्ष, गुरुदेव दत्त महा-ई-सेवा केंद्र चालक, दिघी, पुणे. (इ.लो.से.)<br>२) श्रीमती. नंदा राजू शिवरकर, वय ३६ वर्ष, पद-कॉम्प्युटर ऑपरेटर, गुरुदेव दत्त महा-ई-सेवा केंद्र, दिघी, पुणे (इ.लो.से.) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५,०००/- |
| स्वीकारलेली लाच रक्कम | २,५००/- (दोन हजार पाचशे रुपये) |
| पडताळणी दिनांक | दि. १८/०९/२०२४ रोजी |
| सापळा दिनांक | दि. १८/०९/२०२४ |
| ठिकाण | गुरुदेव दत्त महा-ई-सेवा केंद्र, दिघी, पुणे. |

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार हे उत्पन्नाचा दाखला व डोमीसाईल सर्टिफिकेट काढण्यासाठी गुरुदेव दत्त महा-ई-सेवा केंद्र, दिघी येथे गेले असता, अ.क्र. १ संतोष वाळके व अ.क्र. २ श्रीमती नंदा शिवरकर यांनी तक्रारदार यांच्याकडे आमची तहसिल कार्यालयात ओळख असून, वरील काम करुन देण्यासाठी त्यांच्याकरीता रुपये ५,०००/- द्यावे लागतील अशी लाचेची मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारदार यांच्या तक्रारीची पडताळणी पंचासमक्ष केली असता, गुरुदेव दत्त महा-ई-सेवा केंद्र चालक अ.क्र. १ संतोष वाळके व त्यांच्या महा-ई-सेवा केंद्रात काम करणारी महिला क्र. २ श्रीमती नंदा शिवरकर यांनी तक्रारदार यांचेकडे वरील काम करुन देण्यासाठी शासकीय फी व्यतिरिक्त ५,०००/- रुपयांची लाच मागणी करुन, क्र. २ श्रीमती. नंदा शिवरकर हिने तक्रारदार यांचेकडून रुपये २,५००/- लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारले असता त्यांना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांचेविरुद्ध दिघी पोलीस स्टेशन, पिंपरी-चिंचवड, पुणे येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलमान्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक विरनाथ माने तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
४) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
५) ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

दयानंद गावडे
सहा.पोलीस आयुक्त / पो. उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.